GROWEL
SINCE 1957

# Grauer & Weil (India) Limited

CHEMICALS | ENGINEERING | PAINTS | LUBE | REAL ESTATE

Date : 25/09/2020

To,
**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai – 400001

**Re : Security Code No. 505710**

**Subj.: Submission of newspaper publication under Regulation 47 of SEBI (LODR) Regulations, 2015**

Dear Sir/Madam,

With reference to the abovementioned subject and Pursuant to Regulation 30, 34, 47 and all other applicable regulations of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find attached herewith Press Release (news paper advertisement) published in the newspapers viz. 'Business Standard' and 'Mumbai Tarun Bharat' on 23rd September, 2020 for Intimation of Corrigendum to the Annual Report of the Company for FY 2019-20.

Kindly take the same on the records and acknowledge the receipt.

Thanking you

Yours faithfully,

**FOR GRAUER & WEIL (INDIA) LIMITED**

**CHINTAN K. GANDHI**
**COMPANY SECRETARY**

GRAUER & WEIL (INDIA) LTD. MUMBAI 400101

**Regd. Office:** Growel Corporate, Akurli Road, Kandivli (E),
Mumbai (Maharashtra) 400 101, India
**T** +91-22-66993000 **F** +91-22-66993010 **E** hq@growel.com
www.growel.com
*CIN L74999MH1957PLC010975*

# जिल्हा परिषदेच्या १२ टक्के विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण

**नाशिक,दि.२२(प्रतिनिधी):** कोरोना विषाणू संसर्गाच्या काळात जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी लीना बनसोड यांनी विविध उपक्रम राबविण्यास सुरवात केली. 'डोनेट अ डिव्हाईस' या चळवळीअंतर्गत ०१ हजार, ४४३ उपकरणे भेट मिळाली आहेत. याशिवाय पहिली ते आठवीच्या एकूण ०२ लाख, ६७ हजार, ७९४ विद्यार्थ्यांपैकी १२ टक्के म्हणजे ३२ हजार, ८१ विद्यार्थ्यांची ऑनलाईन शिक्षणाची सोय झाली आहे. त्यात ऑनलाईन 'झूम', 'गुगल मीट', 'जिओ मीट', 'गुगल क्लासरुम', 'दिक्षा' ॲपचा समावेश आहे. सोशल मीडियाच्या ॲपच्या माध्यमातून ०१ लाख, ०३ हजार, ५८० विद्यार्थ्यांना अध्यापन केले जात आहे. दूरचित्रवाहिनी संच, रेडिओ, फोन कॉल, एसएमएस अशा ऑफलाईन पद्धतीने ९२ हजार, १११ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ८९ हजार, १२ विद्यार्थ्यांना ' 'फेस टू फेस' शिकविले जात आहे. जिल्ह्यात पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांची संख्या १३ लाख, ०७ हजार, ०२२ आहे. जिल्हा परिषद, नगर परिषद, कटक मंडळ, सरकारी, खासगी अनुदानित, विनाअनुदानित, स्वयं अर्थसाहाय्यित, महापालिका अशा ०५ हजार, ६२६ शाळांमधून या विद्यार्थ्यांना ४१ हजार, २१७ शिक्षक अध्यापन करत आहेत.




### भेट मिळालेल्या साहित्याची संख्या याप्रमाणे


स्मार्टफोन– २३३ , साधे फोन– १४७ , टेबल– ४० , पेनड्राईव्ह– २७ ९, दूरचित्रवाणी संच– ३५ , संगणक डेक्सटॉप –३१, लॅपटॉप– सात, वर्कबुक– ३८९, रेडिओ– २१३, वायफाय –३, स्पीकर एम्पिफायर –६६ . तंत्रसेतू उपक्रमांतर्गत १० हजार, ९०२ शिक्षकांनी तंत्रसेतू हेल्पलाईनसाठी नोंदणी केली आहे. याशिवाय २७ हजार, २७० विद्यार्थी आणि पालक, तर ३११ शिक्षणप्रेमी व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांचा सहभाग मिळाला आहे. शैक्षणिक अध्यापन माध्यमात ५१ हजार, ६२९ विद्यार्थ्यांची जबाबदारी ०८ हजार, ९३९ गल्लीमित्रांनी स्वीकारली आहे. ३८ हजार, ४५ विद्यार्थ्यांना ०७ हजार, ३७१ विषयमित्र अध्यापन करत आहेत. ०१ लाख, ०३ हजार, ९२३ विद्यार्थ्यांना गटांतर्गत अध्यापन केले जाते. गृहभेटीद्वारे ०७ हजार, ६५६ जण ०१ लाख, ३७० विद्यार्थ्यांना शिकवत आहेत.

०१ लाख, १७ हजार विद्यार्थी ऐकतात. रेडिओ ०१ लाख, १७ हजार, २१९ विद्यार्थी रेडिओवरील शैक्षणिक कार्यक्रम ऐकतात. ०२ हजार, ४९५ शाळा हे कार्यक्रम ऐकवत असून, १० हजार, ३४२ शिक्षकांनी त्यासाठी पुढाकार घेतला आहे. शैक्षणिक कार्यक्रम ऐकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अशी : रेडिओ– १४ हजार, ११६, एफएमद्वारे– १३ हजार, १७८, मोबाईलद्वारे–३४ हजार, २६२, मोबाईल ॲपद्वारे –५५ हजार, ६६३.

### ५५० शाळांची वीजखंडित युडायस प्लस

२०१९–२०२० नुसार जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी ३२७ अतिरिक्त वर्गखोल्यांची मागणी आहे. ०१ हजार, ७६५ वर्गखोल्यांची मोठी दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. हजार २५३ शाळांसाठी इमारत उपलब्ध असून, १३ शाळांना इमारतीची आवश्यकता आहे. ०३ हजार, २५७ शाळांमध्ये स्वच्छतागृह असून, नऊ ठिकाणी उपलब्ध नाही. ०३ हजार, २४२ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा आहे. २४ शाळांमध्ये ही सुविधा नाही. ०२ हजार, ५०९ शाळांमध्ये विद्युतीकरण झाले आहे. २०७ शाळांमध्ये विद्युतीकरण नाही. तसेच ५५० शाळांचे वीजबिल न भरल्याने वीज खंडित करण्यात आली आहे.

# नाशिकमध्ये 'कोरोना'रुग्णसंख्येत वाढ, तर मृत्युदरात घट



**नाशिक,दि.२२(प्रतिनिधी):** नाशिक महानगरपालिका क्षेत्रात कोरोना संसर्ग लक्षात घेऊन 'ॲन्टिजेन' चाचणी, वाढविल्यामुळे शहरात रुग्ण वाढत असले तरी आता रुग्णांच्या तुलनेत मृत्युदर घटला आहे. मागील जुलै महिन्यात मृत्युदर २.९२ टक्के होता. आता रुग्णदर वाढत असला तरी मृत्युदर १.६७ टक्क्यांवर आला आहे. नाशिक शहरातील कोरोनाचा संसर्गाचे प्रमाणात वाढ होत असून आता दररोज सरासरी ७०० ते ८०० अशा नवीन रुग्णांची भर पडत आहे. परिणामी शहरातील आत्तापर्यंत कोरोनाबाधितांचा आकडा ३७ हजारांवर गेला आहे. तसेच एकूण मृत्यूचा आकडा ५९९ पर्यंत पोहोचला आहे. सप्टेंबरच्या १४ दिवसांत शहरात १०८ जणांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. मागील ऑगस्ट महिन्यात २१५ जणांचा बळी गेला होता. आता दिवसाला सरासरी सात ते आठ जणांना मृत्यू होत आहे.

गेल्या एप्रिल महिन्यात केवळ १० रुग्ण असताना एकही मृत्यू झालेला नव्हता. त्यानंतर मे महिन्यात कोरोना संक्रमण वाढत गेल्यानंतर या महिन्यात २१४ रुग्ण होऊन आठ जणांना मृत्यू झाला होता. नंतर जून महिन्यात रुग्णसंख्या अडीच हजाराच्या घरात असल्याने मृत्युदर ४.८१ टक्के झाला होता.

ऑगस्ट महिन्याच्या १६ दिवसांत रुग्णांचा आकडा १६ हजारांवर गेला असला तरी मृत्युदर आणखी घटला होता. आता सप्टेंबर महिन्यातदेखील रुग्णांचा आकडा वाढता असला तरी मृत्यूचे प्रमाण १.७७ टक्क्यांवरुन १.६७ टक्के इतके झाले आहे.

**शहरातील कोरोना मृतांची स्थिती**

| महिना | रुग्ण | मृत्यू | प्रत्यक्ष मृत्यू | मृत्यूदर |
|---|---|---|---|---|
| एप्रिल | १० | ०० | ०० | ०० |
| मे | २१४ | ०८ | ०८ | ३.७३% |
| जून | २१८२ | १०५ | ९७ | ४.८१% |
| जुलै | ९४४१ | २७३ | १७१ | २.९२% |
| ऑगस्ट | १६३८१ | ४९१ | २१५ | २.४१% |
| १४ सप्टेंबर | १६३८१ | ३९५ | १०८ | १.६७% |

**उपचार सुरू असलेल्या रुग्णांमध्ये ३५६ ने घट**

### 'भारतमाला' प्रकल्पातील रस्त्याचे भूमिपूजन

**नाशिक :** नाशिक मुंबई, घोटी परिसर व परिसरातील ग्रामीण राजमार्गांना जोडणारा महत्त्वाचा उड्डाणपूल या परिसरात होणे, ही काळाची गरज होती. अपघातांचे प्रमाण यामुळे कमी होण्यास मदत होणार आहे. विकासाच्या दृष्टीने अधिकाधिक लक्ष केंद्रित करणार असल्याचे प्रतिपादन खासदार हेमंत गोडसे यांनी केले. घोटी–सिन्नर व वैतरणा–खंबाळे, मुंबई–नाशिक चौफुली महामार्गावर भारतमाला प्रकल्पांतर्गत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालय निधीअंतर्गत खा. हेमंत गोडसे यांच्या हस्ते येथील उड्डाणपुलाचे भूमिपूजन करण्यात आले.

# 'त्या' डॉक्टरांवर कारवाई कधी?

**नाशिक, दि. २२ (प्रतिनिधी):** कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वैद्यकीय विभागासाठी मागील महिन्यात झालेल्या डॉक्टर्स, नर्सेस व इतर पॅरामेडिकल स्टाफ पदाच्या भरतीच्या मुलाखतीनंतर नियुक्ती आदेश देऊनही कामावर हजर होण्यात नकार देणारे व नियुक्ती आदेश दिल्यानंतर कामावर हजर होऊन पुन्हा गायब झालेल्या आरोग्य सेवकांना फौजदारी कारवाईचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला होता. महिना उलटूनही कोरोना संकट काळात आरोग्यसेवा नाकारणाऱ्यावर अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही. यामुळे आता या डॉक्टरांविरुद्ध कधी कारवाई होणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. ऑगस्ट महिन्यात तत्कालीन आयुक्त राधाकृष्ण गमे यांच्या निर्देशानुसार महापालिका प्रशासनाकडून ७० आरोग्यसेवकांवर गुन्हे दाखल करण्याच्या व २०० जणांवर 'मेस्मां'तर्गत नोटिसा बजावण्याच्या हालचाली सुरु झाल्या होत्या. मात्र, त्यांची बदली झाल्यानंतर ही कारवाई थांबली आहे. शहराला कोरोनाचा विळखा बसत असताना आता रुग्णालयात डॉक्टराची कमतरता भासत असून कोविड केअर सेंटर, कोविड हेल्थ सेंटर व कोविड रुग्णालय याठिकाणी पुरेशे डॉक्टरांची व कर्मचारी नसल्याच्या तक्रारी नगरसेवक व रुग्णांचे नातेवाईक करीत आहे. काही ठिकाणी डॉक्टरांअभावी रुग्णांची स्थिती गंभीर होत आहे. पुढच्या महिन्यात शहरातील रुग्णांचा आकडा ७० हजारांवर जाण्याची शक्यता असून मृत्यूचा आकडा वाढता आहे. या एकूणच पार्श्वभूमीवर आता डॉक्टरांची कमतरता भासणार असून महापालिका प्रशासनाकडून तातडीने डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्याची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर नवीन भरती करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. मात्र, यास वेळ जाणार असुन ऑगस्ट महिन्यात ज्या डॉक्टरांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आणि २०० जणाविरुद्ध मेस्मा कायद्यांतर्गत नोटिसा पाठविण्याची कारवाई करण्यात येणार होती. नवीन आयुक्त कैलास जाधव हे ही कारवाई कधी करणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# छोट्या प्रकल्पांना गती देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखणार : जयंत पाटील

**नाशिक, दि. २२ (प्रतिनिधी):** उत्तर महाराष्ट्रासह मराठवाड्याला पाणी मिळण्यासाठी मोठ्या प्रकल्पांचे शाश्वत, परिणामकारक नियोजन करण्यात यावे. तसेच जिल्ह्यातील छोट्या प्रकल्पांना गती देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रमाची आखणी करण्याच्या सूचना जलसंपदामंत्री जयंत पाटील यांनी दिल्या आहेत. आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात जलसंपदा विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी राज्याचे अन्न, नागरीपुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री तथा पालकमंत्री छगन भुजबळ, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, आमदार माणिकराव कोकाटे, दिलीपराव बनकर, हिरामण खोसकर, नितीन पवार, सरोज आहेर, डॉ. राहुल आहेर, जलसंपदा विभागाचे सचिव एन. व्ही. शिंदे, जिल्हाधिकारी सुरज मांढरे आदी उपस्थित होते.



यावेळी बोलताना मंत्री पाटील म्हणाले, ''महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यापासून नाशिक जिल्ह्यातील प्रकल्पांच्या सर्वेक्षण व मान्यतांचा महिन्यातून एकदा आढावा मंत्रालय स्तरावर घेण्यात येतो. लवकरात लवकर हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याबरोबरच शिल्लक कामांसाठी स्वामित्व मंजूर करणे तसेच नाशिक, अहमदनगर जिल्ह्यातील वगळण बंधाऱ्यांच्या व लिफ्टच्या कामात शासनाने विशेष लक्ष केंद्रित केले असून तातडीने ही कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. गोदावरी खोऱ्यातील प्रकल्पांचे पाणी नाशिक, नगरसह जायकवाडीपर्यंत मुबलक तसेच सातत्यपूर्ण प्रवाहात राहण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. जिथे शक्य आहे तिथे पाणी वळवण्यसाठीच्या शक्यता तपासून त्याप्रमाणे आखणी करण्यात येईल. तसेच लहान व पटकन पूर्ण होणारे प्रकल्प तत्काळ पूर्णत्वासाठी नेले जातील. त्यासाठी निधीची तरतूदही केली जाईल. मोठ्या प्रकल्पांसाठी प्रसंगी कर्जही काढण्याचे नियोजन केले जाईल. आमदारांच्या मतदारसंघातील चाऱ्यांची कामे तसेच कॅनॉलच्या देखभाल व दुरूस्तीची कामे त्यांच्यासोबत बसून चर्चेतून अधिकाऱ्यांनी पूर्ण करावेत, त्यासाठी १० टक्के निधीची तरतूदही करण्यात आली आहे,'' असे त्यांनी सांगितले.

# वर्तमानपत्रामुळे 'कोरोना' होत नाही; 'कोरोना' संकटात वृत्तपत्र हेच आपले खरे मित्र : रणजितसिंह राजपूत

**नाशिक, दि. २२ (प्रतिनिधी):** ''वृत्तपत्र वाचल्याने, हातात बाळगल्याने कोरोना होत नाही. कोरोना संकटाच्या काळात समाजात अधिकृत, वस्तुनिष्ठ माहिती ही वृत्तपत्रांच्याच माध्यमातून दिली जात आहे. या संकटकाळात माणसांमध्ये सकारात्मक जाणिवा निर्माण करण्याचे कामदेखील ते करत आहेत. वृत्तपत्र हेच आपले मित्र आहेत. त्यामुळे अफवांना बळी न पडता वृत्तपत्र नियमित वाचायला हवीत,'' असे आवाहन नाशिक विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक रणजितसिंह राजपूत यांनी केले.

'कलेक्टरकडून सूचना' अशा आशयाचा संदेश जिल्हा माहिती कार्यालयांच्या नावाने नाशिकसह विभागातील अहमदनगर, धुळे, जळगाव, नंदुरबार या जिल्ह्यांत व्हॉट्सॲप व सोशल मीडियाच्या माध्यमातून काही समाजकंटक व खोडसाळ प्रवृत्तीचे लोक पसरवत आहेत. त्यात प्रामुख्याने आपल्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तू बंद करणे, त्यांच्या हाताळणी, बाळगणे, व काळजी घेण्याबरोबरच 'वृत्तपत्रे बंद करा. नाहीच जमले तर एका ट्रेमध्ये चोवीस तास हात न लावता ठेवा. दुसऱ्या दिवशी वाचा,' अशा आशयाची अशास्त्रीय, अशुद्ध, निराधार माहिती देण्यात आली आहे. दुधाच्या पिशव्या, वर्तमानपत्रे या वस्तूंच्या माध्यमातून कोरोनाचा विषाणू पसरण्याची शक्यता नाही. मात्र, वृत्तपत्रे, दुधाच्या पिशव्या आदी वस्तूंच्या माध्यमातून हा विषाणू पसरतो, अशी अफवा पसरवली गेली आहे. त्यातून काही गृहसंकुलांनी दूधविक्रेते आणि वृत्तपत्र विक्रेत्यांना मनाई करण्याचे प्रकार घडत आहेत. वाचन ही आपली समृद्ध संस्कृती आहे, ती वर्तमानपत्राच्या माध्यमातून जपण्याचे कार्य सामाजिक आणि कौटुंबिक स्तरावर आपण करत आलो आहोत. ही संस्कृती जपण्याचे आणि वृद्धिंगत करण्याची जबाबदारी आपली सर्वांचीच आहे, वृत्तपत्र ही आपल्या कुटुंबाच्या दैनंदिन जगण्याचा, भविष्याची दिशा ठरवण्याचा अविभाज्य घटक आहे. 'माझे कुटुंब व माझी जबाबदारी' च्या मोहिमेत आपण जबाबदार कुटुंबाचे घटक म्हणून वृत्तपत्र वाचून वाचन संस्कृती बळकट करूया'', असेही आवाहन राजपूत यांनी केले.

# सामाजिक वनीकरण विभागाकडून पुरातन महावृक्षांची गणना

**नाशिक,दि.२२ (प्रतिनिधी):** अनेक ठिकाणी वड, पिंपळ, आंबा, चिंच आदी प्रजातींचे पुरातन वृक्ष जागोजागी आहेत. हे महावृक्ष ५० ते १००,२०० वर्ष जुने आहेत. अशा महावृक्षांची स्वतंत्र नोंदणी करण्याचे अभियान राज्याच्या सामाजिक वनीकरण विभागातर्फे राबविले जात आहे.

कोलकाता येथील 'बॉटनिकल गार्डन'मध्ये असलेला २५० वर्ष जुना वटवृक्ष असो की अनंतनाग, आंध्र प्रदेशचा सव्वाचार एकरामध्ये पसरलेला विशाल वटवृक्ष असो, ही त्याच परंपरेची उदाहरणे आहेत. महाराष्ट्रातही अशी प्राचीन व विस्तीर्ण झाडे गावोगावी आहेत. हे महावृक्ष केवळ वयाने आणि आकाराने मोठे नसून त्यांनी आपली स्वतंत्र अशी परिसंस्थाच तयार केली आहे. त्यामुळे या महावृक्षांची नोंदणी प्रेरणादायी ठरणारी असल्याचे मत सामाजिक वनीकरण विभागाने व्यक्त केले. याद्वारे ही झाडे कुठे आहेत, त्यांची सध्याची परिस्थिती काय आहे, आदी माहिती गोळा केली जाणार आहे. या माहितीच्या आधारे या वृक्षांचे संवर्धन करता येईल. यासाठी स्थानिक जनसामान्यांच्या, पर्यावरणप्रेमींच्या, अशासकीय संस्थांच्या माध्यमातून ही नोंदणी केली जाणार आहे. वनेतर क्षेत्रामध्ये वड, आंबा, पिंपळ, जांभूळ, मोहा, साग, अर्जुन आदी प्रजातींच्या विशाल झाडांची नोंदणी करण्याचे निर्देश प्रादेशिक तसेच विभागीय वनअधिकारी कार्यालयांना देण्यात आले आहेत.

# सटाणा-ताहाराबाद रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य



**सटाणा,दि.२२(प्रतिनिधी):** सटाणा–ताहाराबाद राज्य महामार्गावरुन वाहनधारकांना वाट काढणे अतिशय बिकट व कठीण झाले असून खड्ड्यांमुळे या महामार्गाची पूर्णतः चाळण झाली असून हा महामार्ग मृत्यूचा सापळा बनला आहे.

महामार्गावर पडलेल्या असंख्य खड्ड्यांमध्ये वाहने पडून अनेक वाहने नादुरुस्त होतात. खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांना गाडी चालवताना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे. संबंधित विभागाकडून या महामार्गावरील खड्ड्यांची कुठलीही दुरुस्ती होत नसल्याने वाहनधारकांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अनेक ठिकाणी तर महामार्गावरील रस्ता गायब होऊन फक्त मोठे खड्डे पडले असल्यामुळे रोज अपघातांना आमंत्रण मिळत आहे. हा महामार्ग गुजरात, नाशिक, धुळे, मालेगाव, सिन्नर, मनमाड येथे जाण्यासाठी जवळचा व सोयीचा असून या भागातील औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांना लागणारा कच्चा मालही याच महामार्गावरुन नेला जात असल्याने हजारो अवजड वाहने या महामार्गावरून धावत असतात. महामार्गावर मोठ्या संख्येने खड्डे पडल्याने चुकवावे तरी कोणते, महामार्गावर प्रवास करताना रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता, असे म्हणण्याची वेळ वाहनधारकांना आली आहे.

> गेल्या आठ दिवसांपूर्वी याच महामार्गावर दोन मोटारसायकलस्वारांचा अपघात होऊन त्यांना आपला जीव गमवावा लागला होता. त्यावेळी प्रहार संघटनेच्यावतीनेच्या रस्त्यावर आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी त्यांना खड्डे बुजवण्याचे आश्वासन देऊन आंदोलन मागे घेण्यास सांगण्यात आले. परंतु अध्यापनापर्यंत कुठलाच खंडा बुजवण्यात आला नसल्याने प्रहार संघटना पुन्हा कुठल्याही क्षणी आंदोलन करणार आहे.
>
> – **तुषार खैरनार**, तालुकाध्यक्ष, प्रहार संघटना

# 'विकेल ते पिकेल' या संकल्पनेतून ग्राहकांना दर्जेदार भाजीपाला व फळे उपलब्ध होणार

**मालेगाव, दि. २२ (प्रतिनिधी):** ''बाजारामध्ये ज्या बाबींची मागणी असेल त्याच पद्धतीने शेतकऱ्यांनी पीक घ्यावे. 'विकेल ते पिकेल' या संकल्पनेचा भाग म्हणून मालेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील भाजीपाला थेट ग्राहकांसाठी शहरात विविध १३ ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आला आहे. एक छोटासा प्रयोग असून मालेगाव तालुक्यातील हा प्रयोग यशस्वी झाल्यास संपूर्ण राज्यात तो राबविला जाईल,'' असे प्रतिपादन राज्याचे कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी केले.

कृषी विभागाच्या माध्यमातून शहरामध्ये १३ ठिकाणी भाजीपाला व फळे विक्री केंद्राचे उद्घाटनप्रसंगी मंत्री भुसे बोलत होते. यावेळी उपमहापौर निलेश आहेर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजेंद्र जाधव, उपसभापती सुनील देवरे, उपविभागीय कृषी अधिकारी दिलीप देवरे, तहसीलदार चंद्रजित राजपूत, तालुका कृषी अधिकारी बाळासाहेब व्यवहारे, नगरसेवक सखाराम घोडके, जयप्रकाश बच्छाव, कविता वाघ, राजाराम जाधव, पंचायत समिती सदस्य भगवान मालपुरे, गिरणाथडी शेतकरी उत्पादक कंपनीचे नीळकंठ निकम, प्रमोद निकम, देवरे, प्रमोद शुक्ला, रामभाऊ मिस्तरी, कृषी विभागाचे तंत्र अधिकारी गोकुळ अहिरे, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी पदाधिकारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी बोलताना भुसे म्हणाले 'विकेल ते पिकेल' या माध्यमातून शेतकऱ्यांना दोन पैसे जास्त मिळतील. एकंदरीतच यामागे शेतकऱ्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी हे ध्येय आणि उद्दिष्ट आहे. हा एक प्रयोग असून या माध्यमातून ग्राहकांना दर्जेदार, ताजा भाजीपाला वाजवी दरामध्ये उपलब्ध होणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी मालेगाव शहरात भाजीपाला विक्री ही सटाणा नाका, डी. के. कॉर्नर जवळ, अरोमा थिएटरजवळ, दौलती हायस्कूल जवळ, कृषी नगर स्टॉपजवळ, ६० फुटी रोड डॉ.शरद पाटील यांच्या रुग्णालयाजवळ, चर्चगेट जवळ, मोतीबाग नाका, रावळगाव नाका, वर्धमान नगर प्रवेशव्दाराजवळ, दत्त मंदिर संगमेश्वर, निसर्ग चौक कलेक्टर पट्टा, जुने आरटीओ ऑफिस नामपूर रोड, या १३ ठिकाणी ठरविण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी कृषी विभागाचा संत सावता माळी रयत बाजाराचा लोगो असलेली सात फुटी व्यासाची छत्री देण्यात आली असून त्यठिकाणी भाजीपाला क्रेट्स, भाजीपाला मांडणी, शेतकऱ्यांना भाजीपाला विक्रीकरिता देण्यात येणार असून शेतकऱ्यांना या स्टॉलवरुन ताजा भाजीपाला थेट ग्राहकांना विक्री करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. भाजीपाला स्टॉलवर उपस्थित शेतकरी बांधवांना एक विशिष्ट पोशाख आणि ओळखपत्र राहणार आहे. कोविड विषाणूच्या प्रादुर्भावाबाबत विशेष काळजी घेण्यात येणार असल्याचेही उपविभागीय कृषी अधिकारी देवरे यांनी यावेळी सांगितले.

# गावच्या सार्वजनिक स्वच्छतेसाठी उपोषणासह आत्मदहनाचा इशारा

**येवला, दि. २२ (प्रतिनिधी):** येवला तालुक्यातील पाटोदा गावामध्ये मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असल्यामुळे आरोग्याच्या व दुर्गंधीच्या मोठ्या समस्या निर्माण होत आहेत. या समस्या सोडवण्यासाठी मागणी करत येथील युवक महेश शेटे यांनी आठ तासांच्या लाक्षणिक उपोषणासह आत्मदहनाचा इशारा दिला आहे. त्यासंदर्भातील निवेदन त्यांनी आज ग्रामपंचायत पाटोदा येथील प्रशासक वि. के. अहिरे तसेच ग्राम विकास अधिकारी बी. एल. मोहिते यांना दिले आहे. शेटे यांनी दिलेल्या माहितीनुसार पाटोदा गावातील स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आहे. ग्रामपंचायतच जर नदीपात्रात कचरा टाकत असेल तर नागरिकांनी काय करायचे , वेळोवेळी तोंडी विनंती केली असता साफसफाई करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत पाटोदाची नाही, असेही बेजबाबदार उत्तर सत्ताधारी लोकप्रतिनिधी देत आहेत. गावांची १०० टक्के स्वच्छता करावी व यापुढेही गावाची १०० टक्के स्वच्छता राखली जाईल, असे लेखी आश्वासन द्यावे तेव्हा आपण उपोषणाला बसण्यापासून माघार घेण्यास तयार असल्याचे शेटे यांनी सांगितले. अन्यथा दि. २ ऑक्टोबर गांधी जयंतीनिमित्त आठ तासांचे लाक्षणिक उपोषण व त्यानंतर आत्मदहन करण्याचा इशारा त्यांनी आपल्या निवेदनातून दिला आहे.

**ग्रौअर ॲण्ड वेल (इंडिया) लि.**
नोंद. कार्यालयः ग्रोवेल कॉर्पोरेट, आकुर्ली रोड, कांदिवली - पूर्व, मुंबई - ४००१०१.
दूर.: ०२२-६६९९३०००, फॅक्स : ०२२-६६९९३०१०, ईमेल : secretarial@growel.com
वेबसाईट : www.growel.com, सीआयएन : L74999MH1957PLC010975

**सूचना**
**वित्तीय वर्ष २०१९-२० करिता कंपनीच्या वार्षिक अहवालाचे शुद्धीपत्रक**
**ग्रौअर ॲण्ड वेल (इंडिया) लि. च्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

कंपनीच्या भागधारकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, मार्च ३१, २०२० रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता कंपनीच्या ६२ व्या वार्षिक अहवालाच्या पान क्र. १४७ वरील एकत्रित वार्षिक लेखांच्या "विभागीय अहवाल" तक्त्याअंतर्गत "विभागीय मालमत्ता"च्या आकड्यांमध्ये अनवधानाने काही छपाई आणि टायपोग्राफिक त्रुटी राहून गेल्या आहेत.
एजीएमच्या सूचनेसह वित्तीय वर्ष २०१९-२० करिता सुधारित वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाईट https://growel.com/subpage/annual-report येथे उपलब्ध आहेत आणि ज्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठविण्यात आलेली होती आणि ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/निबंधक आणि हस्तांतरण एजन्ट/डिपॉझिटरी पार्टीसिपन्ट्स यांच्याकडे नोंदणीकृत आहेत त्यांना ईलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात येत आहेत.
"विभागीय मालमत्ता" मधील उपरोल्लेखित छपाई आणि टायपोग्राफिकल त्रुटींव्यतिरिक्त प्रसिद्ध वित्तीय वर्ष २०१९-२० करिताच्या वार्षिक अहवालामध्ये इतर कोणतेही बदल नाहीत. यामुळे झालेल्या असुविधेकरिता अत्यंत दिलगीर आहोत.

ग्रौअर ॲण्ड वेल (इंडिया) लि.
सही/-
निरजकुमार मोरे
व्यवस्थापकीय संचालक (डीआयएन : ००११३१९१)
दिनांक : २२.०९.२०२०
ठिकाण : मुंबई

महावितरण
**ई-निविदा सुचना**

खालील कामे करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र./अंदाजित रक्कम/निविदा शुल्क कामाचे स्वरूप | निविदा भरण्याची अंतिम तारीख व वेळ |
|---|---|
| निविदा क्र. काअ/मुलुंड/टेंडर/ई–८/२०२०–२१ निविदा रक्कम रु.३५,००,०००/– निविदा शुल्क रु.२९५०/– (ऑनलाईन) मुलुंड सं.व सु विभागातील जिरो पीसी ग्राहकांच्या मीटरचे वाचन CMRI द्वारे करणे. वीज बीलांच्या छपाईचे काम करणे. वीज बीलांचे वितरण करणे. | दि.२९.०९.२०२० वेळः१८.०० वाजेपर्यंत |

सदर निविदा आमच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर दि. २२.९.२०२० पासून उपलब्ध आहे. पूर्ण भरलेली निविदा वर दर्शविलेल्या दिनांक व वेळेपर्यंत स्विकारण्यात येतील.
संपर्क– उपकार्यकारी अभियंता, दुरध्वनी क्र. ९९३०२६९६७२
कार्यकारी अभियंता, मुलुंड.

# Increased order flows boost road infra players' earnings estimate

## Analysts expect a much better performance in second half of FY21

UJJVAL JAUHARI
New Delhi, 22 September

Road infrastructure players are in the spotlight with improving order flows, better labour availability, and construction activities gaining pace as the monsoon season comes to an end. For toll road operators, the improving traffic, too, bodes well. Overall, analysts expect a much better second half of FY21 after a significant impact from the lockdown during the first half.

Alok Deora of YES Securities says there is a significant improvement in the outlook each passing day with improving labour availability (70-80 per cent now); toll collections, too, have improved to about 80 per cent (of pre-Covid levels). As Deora expects further improvement after the end of monsoon, the second half is likely to take care of weakness witnessed in the first half to an extent. The second half always remains key for infrastructure firms and significantly better than the first half in terms of order flows, execution, and receivables. The better second half performance and rising order flows should lead to FY22 earnings estimates getting upgraded, too, and hence, the current estimates reflecting pressure on forward earnings for some players is not a concern, say analysts.

The news flow on order receipts is already encouraging. For instance, Dilip Buildcon has announced receiving the letter of acceptance (LoA) on September 9 from the National Highways Authority of India (NHAI) for the hybrid annuity model (HAM) project in Bihar.

Analysts say both execution and awarding activity appear to have recovered faster than expected. While the expectation was of a visible slowdown due to the lockdown, road EPC (engineering, procurement, and construction) companies have ramped up faster on the execution front since the phased unlocking of the economy. Those at Nomura attribute the same to liquidity infusion measures undertaken by the Ministry of Road Transport and Highways. The implementation of relief measures provided liquidity support, while the order awarding has surged. The NHAI awarding 26 projects spanning 744 km and worth ₹31,000 crore over the April-August period is said to be higher than the first five months' activity seen during the past three financial years. Analysts expect another ₹50,000 crore worth of NHAI tenders to be awarded in three months.

Nomura is preferring Dilip Buildcon, PNC Infratech, and KNR Constructions which have beaten consensus estimate, as well as Nomura's revenue and Ebitda estimates during Q1. Deora, on the other hand, is preferring KNR Constructions and PNC Infratech, and is positive on Ashoka Buildcon.

Emkay Global, too, is including PNC Infratech and KNR Constructions in its top picks. Other picks of Emkay include L&T and Kalpataru Power, looking at their order visibility from the national infrastructure pipeline.

PNC, which has already doubled since March intra-day lows, remains analysts' favourite. Recent wins-driven augmented revenue assurance and gradually returning execution efficiency are some levers making a case for PNC to sail again on the growth trajectory, sooner than later, say analysts at Anand Rathi. Though working capital may have got slightly stretched, analysts feel the balance sheet is still in shape to help execution efficiency return at the earliest. The target prices of Anand Rathi, YES Securities, and Nomura range between ₹205 and ₹255, indicating a further upside of close to 60 per cent for the stock trading at ₹163 levels.

KNR Constructions had continued with its outperformance even during the June quarter in terms of execution by reporting revenue growth, against a decline expected by analysts. Factoring in the strong Q1FY21 showing, analysts at Motilal Oswal Financial Services had increased their FY21 and FY22 earnings estimates 28 and 7 per cent, respectively, and the target price to ₹295 for the stock trading at ₹247.30.

Among others, confidence in Dilip Buildcon has increased from a better-than-expected June quarter performance and rising order flows. Nomura values the stock at 8.5x FY22 EPS and adds BOT (build, operate, and transfer)/HAM investments at book value to arrive at the target price of ₹500 (the current price is ₹349).

For Kalpataru Power, improving balance sheet metrics and steady medium-term visibility, along with a strong long-term pipeline of railway and T&D orders bodes well as the stock is trading at attractive 7.3x its FY22 earnings, according to Emkay Research estimates.

### HOW VALUATIONS STACK UP



| Company | EPS (₹) | | EV/Ebitda (x) | | P/E (x) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | FY21E | FY22E | FY21E | FY22E | FY21E | FY22E |
| Kalpataru Power | 28.3 | 33.4 | 5.5 | 4.9 | 8.5 | 7.2 |
| KEC International | 22.0 | 19.8 | 8.4 | 8.4 | 14.2 | 15.8 |
| KNR Constructions | 16.8 | 14.1 | 7.7 | 8.2 | 14.7 | 17.5 |
| Larsen & Toubro | 68.0 | 55.1 | 15.3 | 16.0 | 12.6 | 15.6 |
| PNC Infratech | 11.5 | 14.4 | 6.9 | 5.8 | 14.2 | 11.3 |
| Dilip Buildcon | 19.2 | 29.6 | 4.8 | 4.1 | 18.2 | 11.8 |

E: Estimates; EV: Enterprise value; Ebitda: Earnings before interest, tax, depreciation, and amortisation
EPS: Earnings per share; P/E: Price-to-earnings
Source: Analyst reports

# IL&FS case: Sebi raises penalty on ICRA, CARE to ₹1 cr each

PRESS TRUST OF INDIA
New Delhi, 22 September

Markets regulator Securities and Exchange Board of India (Sebi) on Tuesday enhanced the penalty amount to ₹1 crore each on ICRA and CARE Ratings in connection with lapses on their part while assigning credit rating to non-convertible debentures of IL&FS. The crisis at diversified IL&FS, the board of which was superseded by the government, came to light in September 2018 and since then, the company, as well as related entities, has come under regulatory lens.

The regulator, in December 2019, had imposed a fine of ₹25 lakh each ICRA and CARE in the matter, saying the default by IL&FS occurred because of the "lethargic indifference and needless procrastination and laxity" of these rating agencies.

Sebi examined the order passed by the adjudicating officer (AO) and observed that the penalty levied by the AO appeared to be erroneous and not commensurate with the overall impact these violations had on the market. In view of the same, the competent authority granted approval to review the AO order and accordingly the regulator issued show cause notices to the rating agencies, "calling upon the reasons why the penalty amount should not be enhanced".

In two separate orders on Tuesday, Sebi said that the lapses on the side of ICRA and CARE, while rating the securities of IL&FS and its subsidiary IL&FS Financial Services, have resulted in real and severe financial loss to investors.

The regulator, further, said it has shaken the investors' faith in the reliability of credit ratings in the context of the corporate debt market.

"Had the noticee downgraded the ratings at the appropriate time and thereby forewarned the investors, the impact of the default on investors who invested in AAA-rated instruments, could not have been this severe," Sebi noted.

# For diversified, low-cost exposure, choose ETFs

## Go with those with a low expense ratio, high trading volume on the exchanges

SANJAY KUMAR SINGH

The National Stock Exchange (NSE) had recently announced that the assets under management (AUM) of the Nifty50-based exchange-traded funds (ETFs) have touched ₹1 trillion. The AUM of all ETFs (equity and debt) have crossed ₹2 trillion. Fund managers say they have witnessed rapid increase in the number of investors in ETFs this year. This indicates elevated interest from retail and high networth individuals (HNIs) in these products.

By taking exposure to an ETF, investors can circumvent the risk of investing in the wrong sectors and stocks. When the market fell towards the end of March, many would have struggled to gauge the impact.

"In an uncertain environment, where it is difficult to judge which sectors or stocks are going to get impacted or emerge, it makes sense to invest in a low-cost basket of blue-chip companies that make up a product like the Nifty ETF," says Vishal Jain, head-ETFs, Nippon Life India Asset Management.

ETFs are a good option for beginners. "They can get exposure to a diversified basket of stocks with a small amount of money," says Vishal Dhawan, chief financial planner, PlanAhead Wealth Advisors. Newcomers also don't need to decide which fund manager to go with.

The benefit of a low cost becomes more pronounced over time. If you pay 5 basis points (bps) as expense ratio in an ETF, over 10 years, you pay 50 bps to the asset management company. In the regular plan of an active fund having an expense ratio of 2.25 per cent, you end up paying 22.5 per cent.

YOUR MONEY

ETFs make it easy to build diversified portfolios. "It's difficult to predict which asset class will move and when. It is important that investors diversify across asset classes. ETFs offer a convenient way to take exposure to different asset classes in a simple and cost-efficient manner," says Jain.

Investors can use ETFs, based on indices like the Nifty50 and the Nifty Next 50, for large-cap exposure and a Midcap 150-kind of index to take exposure to the mid-cap segment. Those who wish to diversify internationally can use ETFs based on the Nasdaq, Hang Seng, etc. Gold ETFs may be considered by those who wish to hedge their portfolios. Investors can also use a core and satellite approach. A large-cap ETF could make up the core portfolio. In the satellite portfolio, investors could have riskier products in anticipation of higher returns.

Take three criteria into consideration while selecting an ETF.

Cost is the first. "Buy a low-cost ETF through a discount broker who charges a very low or zero brokerage fee, so that the total cost incurred on the ETF is less than on a similar index fund," says Avinash Luthria, a Securities and Exchange Board of India-registered investment advisor and founder, Fiduciaries.

Purchase a liquid ETF. Says Luthria: "Suppose an ETF's net asset value is ₹100. If it is illiquid, you could end up selling it at ₹98 or ₹99. Any advantage gained by investing in a low-cost ETF could be lost due to poor liquidity," he says.

Finally, select one with a low tracking error.




### SAFE BET

ETFs: A highly cost-effective investment option

| Scheme name | Expense ratio (%) |
|---|---|
| HDFC NIFTY 50 ETF | 0.05 |
| HDFC Sensex ETF | 0.05 |
| ICICI Prudential Nifty ETF | 0.05 |
| Nippon India ETF Nifty BeES | 0.05 |
| IDFC Nifty ETF | 0.06 |
| Edelweiss ETF – Nifty 50 | 0.07 |
| Nippon India ETF Sensex | 0.07 |
| Tata Nifty ETF | 0.07 |
| ICICI Prudential Sensex ETF | 0.08 |
| Mirae Asset Nifty 50 ETF | 0.08 |

Data is as of August 31. Table includes top 10 Nifty- and Sensex-based ETFs with the lowest expense ratios
Source: *mutualfundindia.com*




**PNB GILTS LTD.**
CIN : L74899DL1996PLC077120
Regd. Office: 5, Sansad Marg, New Delhi – 110 001
Ph: 011-23325759, 23325779. Fax No. 011-23325751, 23325763
E-Mail: pnbgilts@pnbgilts.com, Website: www.pnbgilts.com

**REQUEST FOR PROPOSAL**

PNB Gilts Ltd, a subsidiary of Punjab National Bank, invites proposal (RFP) for Supply, Integration, Implementation, Maintenance and Management of Integrated Treasury Management Solution. RFP containing details like eligibility criteria, scope of work etc. is available at the Company's website www.pnbgilts.com under "Tender" section on the home page. The last date for submission of bid in prescribed mode is 26th October, 2020 ( 5 p.m.).

**For PNB Gilts Limited**
**Sd/-**
**(Seema Misra)**
**Sr. Executive Vice President**

**Place: New Delhi**
**Date: 22nd September 2020**

**PUBLIC NOTICE**

**Shri.Mahendra Gunshi Gada** a Member of **Jai Hari Co-operative Housing Society Limited** having address at A Building, B Wing, Forjett Street, Mumbai : 400026 and holding Flat No.009 in the building of the Socioety, died on 09/07/2013 without making any nomination.

My client **Smt.Ramila Mahendra Gada**, wife of the said deceased member hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimants/ objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/ property of the society within a period of 7 (seven) days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/ objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/ property of the society. If no claims/ objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/ property of the society in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims/ objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/ property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/ objectors, in the office of the society between 12.30 p.m. to 4.30 p.m. from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

**Dated this 23rd day of September 2020 at Mumbai**

**Sd/-**
**Rajaram Ghandade**
**Advocate**
A4/39, Shree Vijay Kunj Co-op. Housing Society Limited,
Kanjur Marg (East), Mumbai : 400042

**GRAUER & WEIL (INDIA) LTD.**
Regd. Office : Growel Corporate, Akurli Road, Kandivli – East, Mumbai – 400101.
Tel. : 022-66993000, Fax : 022 - 66993010, email : secretarial@growel.com
Website : www.growel.com CIN : L74999MH1957PLC010975

**NOTICE**
**Corrigendum to the Annual Report of the Company for FY 2019-20**
**FOR ATTENTION OF SHAREHOLDERS OF GRAUER & WEIL (INDIA) LTD.**

The shareholders of the Company are hereby Informed that there are certain inadvertent printing and typographical errors in the figures of 'Segment Assets' under the table 'Segment Reporting' of Consolidated Annual Accounts, on page no. 147 of the 62nd Annual Report of the Company for the financial year ended March 31, 2020.

The corrected Annual Report for the financial year 2019-20 along with Notice of the AGM are available on the website of the Company at https://growel.com/subpage/annual-report and is being sent through electronic mode to those Members, whom the Notice of the Annual General Meeting has been sent and whose e-mail addresses are registered with the Company / Registrar and Transfer Agent / Depository Participants.

Except, for the aforesaid corrections of printing and typographical errors in the 'Segment Assets' there is no other change in the published Annual Report for the FY 2019-20.

The inconvenience caused in this regard, is highly regretted.

**Date: 22-09-2020**
**Place: Mumbai**

**For Grauer & Weil (India) Ltd.**
**Sd/-**
**Nirajkumar More**
**Managing Director (DIN : 00113191)**

**Public Notice in Form XIII of MOFA (Rule 11(9) (e))**
**District Deputy Registrar, Co-operative Societies, Mumbai City (4)**
Bhandari Co-op.Bank building, 2nd floor, P. L. Kale Guruji Marg, Dadar (West), Mumbai-400028.

No.DDR-4/Mum./ deemed conveyance/Notice/1335/2020 Date: - 11/09/2020
Application u/s 11 of Maharashtra Ownership Flats
(Regulation of the Promotion of construction, Sale, Management and Transfer) Act, 1963

**Public Notice**
**Deemed Conveyance Application No. 113 of 2020**

**Adarsh Co-operative Housing Society Ltd.,** Having address at: Plot No.205/206,TPS No.lll, Road No.51,Off Factory Lane; Borivali (West), Mumbai - 400 092 ---- **Applicant Versus 1. M/s.Krupa Builders A** Partnership Firm, Address: Jay Vijay, Off L.T.Road, Opp.Panjabi Lane, Borivali (West), Mumbai – 400 092, 2. (a) Nilkanth Vinayak Chogle, **(b) Ulhas Nilkanth Chogle, (c) Vijay Nilkanth Chogle, (d) Vijaya Nilkanth Chogle** Address At: Plot No.205/206, TPS No.III, Road No.51, Off Factory Lane, Borivali (West), Mumbai - 400 092, **3.Shri.Hariram Sowar** Keni Plot No.205/206, TPS No.III,Road No.51, Off Factory Lane, Borivali (West), Mumbai - 400 092 ---- **Opponents** and those, whose interests have been vested in the said property, may submit their say at the time of hearing at the venue mentioned above. Failure to submit any say shall be presumed that nobody has any objection to this regard and further action will be taken accordingly. Description of the Property :

**Description of the Property. :-**

| Plot No. | CTS No. | Survey No. | Hissa No. | Claimed Area |
|---|---|---|---|---|
| 205/206 (New No.191) (Village - Borivali ) | 322 | 22 | 8 | The Land bearing, Final Plot No.205/206 (New No.191) of Village – Borivali,Taluka- Borivali,admeasuring 1529.80 square meters as per Property Card and Approved BMC Plan,Origimal Plot No.153 and CTS No.322,Survey No.22,Hissa No.8,of Village - Eksar, Taluka - Borivali,Mumbai Suburban District,with building there on in the society known as Adarsh CHSL, situated at Plot No.205/206, TPS No.III,Road No.51,Off Factory Lane,Borivali (West), Mumbai - 400 092. |

The hearing in the above case has been fixed on **Date : 12/10/2020** at **4.15 p.m.** before District Deputy Registrar, Co-operative Societies, Mumbai City (4). Bhandari Co-op.Bank building, 2nd floor, P. L. Kale Guruji Marg, Dadar (West), Mumbai-400028.

Seal

Sd/-
**(Dr. Kishor Mande)**
**District Deputy Registrar, Co-operative Societies, Mumbai City (4) Competent Authority U/s 5A of the MOFA, 1963.**